कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण प्रारंभ

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/२०१३-१४/५७/२०४

कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण

दिनांक :- २८/२/२०१४

| |
|---|
| क ल न - ४ |
| दस्त क्र. ८८४० /१४ |
| २९/७०२ |

बांधकाम प्रारंभप्रमाणपत्र

श्री/श्रीमती. चंद्रशेखर पी.दिक्षीत व इतर.

कुमुखत्यार :-मे.रचना प्रोजेक्टस् तर्फे भागीदार श्री.अजय पी.अत्रे व इतर.

द्वारा-वास्तुशिल्पकार, श्री.राजन मोडक, डोंबिवली पुर्व.

स्थापत्य अभियंता:-श्री.राजेश अे.ठाकरे, डोंबिवली पुर्व.

विषय:- सि.स.नं. ४३२३ ते ४३२४ मौजे-चोळे, डोंबिवली (पु.) येथे बांधकाम करण्याच्या मंजूरीबाबत.

संदर्भ:- १) आपला दि. ०६-०१-२०१४ रोजीचा श्री. राजन मोडक, वास्तुशिल्पकार, डोंबिवली (पु.) यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र.

२) अंतरिम मंजुरी आदेशपत्र क्र. कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/२०१३-१४/५७ दि. २४-१२-२०१३

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार सि.स.नं. ४३२३ ते ४३२४ मौजे-चोळे, डोंबिवली (पु.) मध्ये ४१९.८९ चौ.मी. क्षेत्रावर ४१९.८० चौ.मी. पर्यंत क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक १२-१२-२०१३ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे स्टील्ट, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला (पै.),चौथा मजला, रहिवासी वाडे-भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

सहाय्यक संचालक नगररचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिका

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावें.

४) ही परवानगी आपल्या मालकीच्या जागेतील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.

६) वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.

९) नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करु नये तसेच नकाशाच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.

११) भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाणाच्या येणाच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.

१२) जागेत जूने भाडेकरु असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करावयाची जबाबदारी मालकाची राहिल व मालक भाडेकरु यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल.

१३) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.

१४) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग, (क.डों.म.पा.)च्या परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करु नये.

TRUE COPY
For RACHANA SHILP